
१९६७
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
ग्रं. क्र. १५४२



# रियाज

...कर बापट

REFBK-0011766
REFBK-0011766

# " रियाज "

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32689 वि: 3८८९
क्रमांक 1952 नों दि: 28/5/52

दिवाकर बापट.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११८६५
प्रत

अशोक प्रकाशन.

REFBK-0011766
REFBK-0011766

-: किंमत :-
६५ नये पैसे

प्रकाशक :-
सौ. मालतीबाई बापट
" अलंकार "
नौपाडा - ठाणें.

मुखपृष्ठ :- श्री. विनायक बापट

-: सर्व हक्क स्वाधीन :-

जानेवारी १९६१

मुद्रक :-
श्री. गो. गो. जोशी
गौतम प्रेस, ठाणें.

# आवाहन

माझिया उरींच्या मुक्त भावनांनों,
जा दूर उंचावरी.
जा रहा भरूनी सदैव
अन् नभाच्या अंतरीं

माझिया उरींच्या सुप्त भावनांनों,
जा फोडूनी दिक्‌कालासहि.
आणि चाखा गोडवी अन्
थोरवी स्वर्गांतली.

माझिया मनींच्या मधुभावनांनों,
मान अपुली वांकवा अन्
व्हा जरा तेथें विनम्र
जेथें वसे सत्यम्-शिवम्-सुन्दरम्

( महाराष्ट्र-दीप. जुलै १९६० )

# मुकें माझें मन

मुकें माझें मन
हिंडे दारोदारीं
डोळस बनुनी
शोधी कांहींतरी.

तिष्ठतों जेव्हां मी
देवाच्या दाराशीं
दिसतात तेथें
फत्तरांच्या राशी.

धुंडावया प्रीत
धांवतों सैराट
शोधुनी ना लाभे
खरीखुरी प्रीत.

जगीं असा दिसे
खोट्याचा पसारा
शाश्वत मूल्यांना
नाहीं येथ थारा.

( चालना. एप्रिल १९६० )

# संदेश

सारे म्हणती या देशाला
" भारत " आहे खंड विशाल
देश न समजूं परि तयाला
समजूं अपुलें महान् घरकूल.

इथें न कोणीं हिंदु-मुस्लिम
भेद नसावा इथें कशाचा
कुणीं गरिब वा श्रीमंतहि कुणीं
नको पसारा या भेदांचा.

वागूं आपण एक दिलानें
उभवूं येथें वैभव मंदिर
ताठ करूनि अन् मान आपुली
जगूं या आपण जीवन सुखकर.

करूं शांतीची उपासना अन्
युद्धाची ती टाळूं भाषा
'जगा आणखी जगूं द्या,' ऐसी
मुखीं असूं द्या अपुली भाषा.

( शिशुरंजन – ७ फेब्रु. १९६० )

# कवि-संमेलन

आठवतें मज एके ठायीं
भरलें होतें कवि-संमेलन
सुकीर्त कवि तैं जमले तेथें
एकापाशीं नव्हती प्रतिभा.

'नांव सोनु अन् हातीं वाळा'
अशीच होती स्थिती तयांची
कुणां न कळलें श्रोत्यांपैकीं
त्यांचीं प्रतिकें, नेणीव त्यांची.

कुणीतरी श्रोता हळूंच वदला
"नवकविता" ती ह्यासच म्हणती
कुणां न कळतें तींतील कांहीं
काव्य तीमधें काहींच नसतें.

वदुनी श्रोता निघून गेला
अनुसरीलें त्या मग सर्वांनीं
अखेर कुणीं ना उरले तेथें
श्रोत्यांवाचून वाचन चाले.

कवीच गायक उरले तेथें
कवीच अपुले श्रोते बनले
काव्यानंदी रंगून गुंगून
हळूंच सारे झोपीं गेले.

(महाराष्ट्र. मे १९६०)

# शोध

कमलदलांशीं रूंजी घालतां
मधुप नकळत अडकून पडतो
तसाच मींहि धुंडीत कांहीं
तव नयनांमधीं मिटून जातों.

शोधीत असतां तव नयनीं गे,
अबोध मजला कांहीं सलतें
अन् नकळत शब्दांवांचून
कविता माझी रूप सजविते.

# यातायात

जन धावुनीया
प्रतिष्ठेच्या मागें
उगा ताणताती
भावनांचे धागे.

कष्टिती जीवाला
जनकल्याणासीं
स्वतःच निर्मिती
काळजीच्या राशी.

करूनी इतुकें
कुठें नाहीं मान
कुठें नाहीं थारा
जीव हो हैराण.

कळेल केव्हां त्या
तयाचें कारण
जगीं असे फक्त
पैशालाच मान.

( "सन्मित्र" दिवाळी १९६० )

## एकच वसतें युग येथें परि

जगण्यासाठीं धडपडणारे
शोधीतात अन् विभिन्न तंत्र
परि न दिसतो ठाऊक त्यांना
साधा सोपा एकच मंत्र.

जाहिरातबाजीवर सारें
जग हें झुलतें; जग हें डुलतें
" केवळ प्रौढांसाठीं " लिहितां
सिनेमास " ही " गर्दी जमते.

दुकानांतल्या भिकार साड्या
उजाळतों अन् प्रकाश त्यांना
खूष होऊनी गिऱ्हाईक मग
पदरीं घेतें माल-पुराणा.

प्रामाणिकता इथें न वसते
इथें न वसतें राज्य-नीतीचें
एकच वसतें युग येथें परी
भंपकतेचें - ढोंगीपणाचें.

( " चालना " सप्टें. १९६० )

# माझ्या मनींच्या पांखरां

माझ्या मनींच्या पांखरां,
राहूं नको कोटरांत
राहूं नको दीनवाणा
एकलाच जीवनांत.

माझ्या मनींच्या पांखरां,
नीत विहर आभाळीं
टाक झाडूनी मनांतील
एकलेपणाची काजळी.

माझ्या मनींच्या पांखरां,
थांबूं नको कोणासाठीं
होऊं नको दीनवाणा
कुणाच्याहि प्रीतीसाठीं.

माझ्या मनींच्या पांखरां,
पिचूं नको रे घरटीं
झेंप घे तूं दूरवरीं
भव्य-दिव्यतेच्या पाठीं.

# दशा !

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

निळ्या निळ्या आकाशींच्या
भव्य दिव्य प्रांगणांत
झेंप घेतसे सदैव
इतस्ततः स्वैरतेंत.

भव्य निळ्या आकाशाची
होती मला जवळीक
माझ्या उंच भरारीचें
जगां होतें कवतिक.

आतां पंख तूटलेला;
नाहीं कशांतहि गोडी
नाहीं मनांत पूर्वींची
उंच जायाची धडाडी.

पंख तूटल्या पांखरां,
कूस हवी रे मायेची
हवी साऊली दयेची
निवाऱ्याची ! निवाऱ्याची !!

# इवलालेंपण

मिटून घेतों मुठींत जेव्हां
हळूंच माझें इवलालेंपण
खिन्न परी मी भासे मजला
हंसतें हिरवें इवलालेंपण.

इवल्या माझ्या जगांत नव्हत्या
निराश भेसूर खिन्न भावना
नव्हतें तेथें क्रन्दन कसलें
नव्हत्या तेथें विकट कल्पना.

आनंदाचें राज्य तिथें जणुं
दुःखाची ना तेथ अवकळा
सुखांत होतों न्हात तेव्हां
देवत्वाची गोड मधु कळा.

म्हणुनि जेव्हां मूठ उघडतों
दिसतें हिरवें इवलालेंपण
मिटून घेतों अपुल्या नयनां
कारण हंसतें इवलालेंपण.

( "चालना" जून १९६० )

## व्यर्थ

मला वाटतें मधुप होऊनी
फुलाफुलांसह विहरावें
गुंजन करूनि गोड तयांशीं
त्यांतच लय मग पावावें.

कधीं वाटतें दीप होऊनी
घराघरांतून तेवावें
अन् दुःखाला-नैराश्याला
जाळूनी स्वयें जळावें.

अशा कल्पना मनीं उठविती
अजस्त्र लाटा; तुफान वादळ
सुचे न कांहीं मला परि मग
मन हें बनतें काळा कातळ.

असेंच सारें जीवन अपुलें
अशींच उठतीं मनीं वादळें
जेथें होतों, तेथें परी मी
पथ माझा ना कधींच विचलें.

("शशी" - वर्षारंभांक १९५९)

# चक्रव्यूह

तूं हंसतां तव गालांवरतीं
खळी पडतसे नाजूक कोमल
बघतां बघतां बुडून जाऊन
शोधीत बसतों अपुलें घरकुल.

# अवेळीं

अशा अवेळीं आलास
कसें मन सांगूं तुला ?
कसा सुगंध रहावा
कोमजल्या जीर्ण फूलां ?

पंख तूटल्या पांखरां
कशी पुन्हां ये भरारी ?
उरीं कशी ये धडक
झेंपायची दूरवरीं ?

आतां दाटतो काळोख
भास्कराच्या प्रकाशींही
काजव्याच्या प्रकाशाची
दीप्ति साहवत नाहीं !

अशा अवेळीं आलास
नाहीं कांहीं माझ्यापाशीं
व्यथा जाळींते ही एक
उरीं चितांच्याच राशी.

( " मल्हार " दिवाळी १९६० )

# चोरटी

कुण्या सुगंध वेलीची
चोरलीस नाजुकता
मदनाचा तूजपुढें
कसा लागेल गे पत्ता.

चोरूनीया घेतलास
आकाशाचा निळेपणा
तुझ्या नयनीं खेळतो
भावभरला तराणा.

चांदण्याची चमचम
चोरूनीया घेतलीस
तुझें मनोज्ञसें तेज
मन करी वेडेंपिसें.

चोरायाचें जेव्हां जगीं
राहिलें न कांहीं एक
माझें मन चोरूनीया
तुवा साधिला उच्चांक.

# राधा

झपझप चाले भयवाटेनें
कमरेवरती घडा घेऊनी
तशांत चावट श्रावण हंसतो
हळूंच कानीं शीळ घालूनी.

अनामिकशा तशा भीतीनें
चिंब जाहली पुरती राधा
उंच उडी घेऊन घटांतील
जलहि होतें उडावित त्रेधा

पाय अडखळे; ऊर धपधपे
भांबावूनी आई राधा
" चित्त-चोरटा " कोण असावा ?
बघण्या हें कां वृत्ती हो द्विधा ?

# श्रावण

अवखळ हंसतो श्रावण हिरवा
हंसऱ्या मखमाली आडून
खुदुखुदु हंसतो-नयनीं शिरतो
जातां जलधारा अन् शिंपून.

जातां शिंपून जलधारा; गाई
खट्याळ श्रावण-रसीलें गाणें
वर्णन करितो उत्कटतेनें
राधा-कृष्णाचीं कूजनें.

तन्मय राधा-खट्याळ मोहन
अनुरागामधीं गोडी मोहक
गीत गाऊनी त्या प्रीतीचें
बहरून जातो श्रावण प्रेरक.

( "महाराष्ट्र-दीप" ऑगस्ट १९६० )

# अवचित

अवचित् येऊन स्वप्नापरी तूं
फुलवून गेलीस भाव-फुलोरा.
तशीच गेलीस निघून अवचित्
घालून सारा गोड पसारा.

जशी शिंपते श्रावण-सर गे,
तशीच आलीस एके दिवशीं
मत्त मयुरापरी नाचलों
असूनहि जरी मी मीतभाषी.

आज अचानक आलीस जैसें
धुकें येतसें चोरपावलीं
धुकें वितळतें; परि न सरते
मूर्ती तुझी गे नयनांपुढलीं.

# उससे मी जादा !

या इथें तरूतळीं
बसलों आहे कधींचा
मजमधें संचरे
रूबाब खय्यामाचा.

हा समोर भरला
प्याला रे मदिरेचा
तो पितां संचरे
कैफ मला काव्याचा.

परि उणीव आहे
एकच येथें फार
मदिराक्षी न येथें
धुन्द कुणी गुलज़ार.

जरी येईल ऐसा
महान् योग जुळून
करील प्रतिभा माझी
खय्यामावर ताण.

# वंचना

अशीच अवचित् आलीस हृदयीं
फुलविलास तूं भाव-फुलोरा
हलवून गेलीस हृन्मंदिर मम
लावून गेलीस मनास चटका.

सहवासांतील आंस तुझी गे,
वाढूं लागली इन्दुकलेसम
परी प्रतिदिनीं बसूं लागला
हळुंहळूं माझ्या खिशास चटका.

परि न त्याचें कांहीं वाटलें
गेलों खर्चित अमाप पैका
उलट्या हृदयाची परी तूं
वयस्थाशीं लाविला ' निका " !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.

# परिणाम

संथ निळ्या जलावर
        जसें फुलावें कमल
तसे तुझ्या नयनांत
        भाव नाचती कोमल.

भाव नाचती कोमल
        उलें मात्र माझें मन.
टिपतांना भाव-विश्व
        जातों अस्तित्व विरून.

जातों अस्तित्व विरून
        जीव जाई सुखावून
लाभे शब्दांना झालर
        मऊ मोरपिसांहून.

# माझी कविता आणि टीकाकार

अशी असावी माझी कविता
तशी नसावी माझी कविता
सल्ला देऊन असा अनाहूत
निघून गेला काव्य-प्रवक्ता

मल्लीनाथीचा विचार करूनी
लिहिली पुनरपि नविन कविता
सफाईचा हलु हात मारूनी
धाडुनि दिधली प्रसिद्धीकरितां.

चार दिसांनीं पत्र पावलें
आणि वाढली मनीं आतुरता
पत्रामधीं त्या लिहिलें होतें,
" नकोत आम्हां असल्या कविता. "

मनांत राही उभा प्रश्न हा,
" हव्यात ह्यांना कसल्या कविता ? "
नुमजे कांहीं; म्हणून ठरवितों,
" बंद करावें लिहिणें कविता.

( " महाराष्ट्र-दीप " दिवाळी १९६० )

# आम्हीं कोण ?

" आम्हीं कोण " म्हणून काय पुसतां
आहे जरी ठाऊक ?
आम्हीं हें दिसतों तसेंच नसतां
कां बोलतां खोंचक ?
" आम्हीं कोण " म्हणून काय पुसतां ?
आम्हीं आहों वेंधळे.
ज्यांचा ख्यात आहे व्यवस्थितपणा
तें कां परि बावळे ?
" आम्हीं कोण " म्हणून काय पुसतां ?
आम्हीं आहों आंधळे.
जे आहेत कितीक डोळस इथें
मार्गी तयां अडथळे !
आहों निर्गूण हे असें जरी आम्हीं
जगण्यास हो लायक
ठायीं ठायीं इथें सदा घडतसें
बा, आमुचें कौतुक !

(" कोंकण-वैभव " दिवाळी १९६० )

# माझा माहेरीचा बोल

माझा माहेरीचा बोल
सुखावितों माझें मन
आणुनिया देई हातीं
माझें हरपलें धन.

नाचतांना मन दंगे
माझा माहेरीचा बोल
आनंदुनी नाचतसे
माझ्या मनाचा चंडोल.

मनानेंच रेखाटतें
चित्र मनीं माहेराचें
जाणवतें स्पष्ट मनीं
भव्यदीव्यपण साचें.

माझ्या माहेरीचा बोल
काय वर्णू मी कौतुक ?
काय गोडवी तयाची
माझी मला ती ठाऊक.

( "चालना" दिवाळी १९६० )

## आणि आज आठवतें

आणि आज आठवतें
विहरतां चांदण्यांत
माझ्या गळां घातलेले
तुझे चंदनाचे हात.

दूर जातां फिरायाला
आठवतों गोड रात
आठवतों किलबील
आगळी ती गोड प्रीत

सारें जणुं वाटतें ग,
घडलेंसें नवथर
न्हातों मी त्या प्रीतींत
वाटे विश्व माझें थोर.

भंगूं नये सदा वाटे
स्वप्न हेंचि गे, पहावें
पुन्हां तूंच यावें येथें
आणि प्रीतींत न्हावें.

( "प्रतियोगी"–दिवाळी १९६० )

# सोत्कंठा मी

मीरा वेडी
मोहित झाली
आणिक धांवे
प्रभु-चरणांशीं
लीन व्हावया.
राधा भोळी
सखू तशी ती
सोडून सारा
मोह पसारा
वेड्या झाल्या
प्रभुमीलनास्तव.
सोत्कंठा मी
तन्मय होऊन
तशीच आलें
तव चरणांशीं
केवळ तुझी रे,
छाया बनण्या.

## रातराणीच्या मस्त सुगंधा

रातराणीच्या मस्त सुगंधा,
नकोस उधळूं मुक्त मनानें
नको जागवूं नयनांपुढलीं
तींच गोड उत्कट स्वप्नें.

नकोस देऊं आठवणींना
नवा उजाळा; नवी भरारी
विरून गेली सहवासांतील
अनुभवलेली मधु माधुरी.

उधळून गेली देवपूजा अन्
इथें राहिला परि निर्माल्य
सौगंधाची आंस परि तव
जागवितें हृदयींचें शल्य.

तुझ्याच गाहिच्या छायेखालीं
न्हात होतें प्रीतीसुखानें
आजपरी त्या छायेखालीं
अविरत चालूं मूक-स्पंदनें.

म्हणून म्हणतें मस्त सुगंधा,
नकोस उधळूं मुक्तमनानें
धुंद तुझीया सुगंधासवें
नको आळवूं प्रीतीचें गाणें.

# सावरकर गुण--गौरव

विद्याभूषित जे महान् जगीं या होऊन गेले जन
नावाचें तुझिया झणिं घडतसें तेथें महत्दर्शन
यत्नांनीं तुझिया भिऊन पुरता गेला इथें यावन
कर्मानें स्वजनांस तूं सुखविलें कष्टांसहि साहून.

दास्याच्या बनवून त्या खिळखिळ्या विक्राळ रे, शृंखला
मोदानें क्रमिलास तूं पथ जरि दारूण तो भासला.
दम्भाचा करूनि निकाल इथला आदर्श तूं घातला.
रङ्कापासून राव ते म्हणूनिया रे, पूजिताती तुला.

साहित्याची तुवा तशी करूनीया सेवा अमोलीक बा,
वर्मी घालूनि घाव तूं आणि इथें निर्मियला दबदबा.
रक्तानें लिहिलें लिखाण तव रे, जाईल ना वाहून
कल्याणाप्रत तें समाज—मन अन् नेईल रे खेंचून.

रज्जू गुंफियले बघून तव ते जोडून ऐसे गुण
होतों नम्र—विनम्र मी तुजपुढें काव्यांजली अर्पून.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 32697 वि: 3K4
नों दि 2/5/5

## दान संत अन् एक पंत

ज्ञानमय जीवन तुझें
नव्हतें अगम्य तुज कांहीं
देऊनीया ज्ञानाचा ठेवा
वाचविला जनसागर तूं.

तुझ्या अभंगाची गोडी
काय वर्णावी पामरें ?
राहिले ना शेष येथें
मनांतले वादळ वारे.

मोदभरें काव्य तुझें
रोमरोमीं भरून वसे
पंक्ती तव केकावलीच्या
तनु मम डोलवितसे.

# असा मी असामी

असा मी असामी
असावा कसामी ?
कुणी सांगताती
असें कांहीं नामी.

" असावा असा मी
नसावा तसा मी "
असा देती सल्ला
कुणी बीनदामी.

मनीं प्रश्न ठाके,
" असावा कसा मी ? "
मनाला पुसें मी,
" सुधारेन कां मी ? "

मनीं स्पष्ट रेखा,
" आहे हा असा मी "
विचारान्तीं वाटे
" आहे कूचकामी ! "

( प्रा. श्री. विन्दा करंदीकर क्षमस्व ! )

# दुलई

निळ्या निळ्या आकाशाच्या
मऊ मऊ दुलईंत
आहे साखर-झोपेंत
पृथ्वीबाळ.

निळ्या निळ्या रंगावर
चितारली आहे गोड
चमचम चांदण्याची
वेलबुट्टी.

("शिशुरंजन"–दिवाळी १९६९)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
REFBK-0011766
REFBK-0011766